# आबासाहेब गरवारे महाविद्यालय

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष हिवाळी शिबीर

## दि. 09/12/2013 ते 15/12/2013

## मु. कोळवडी, ता. वेल्हे

रा.से.यो. चे एकूण 74 स्वयंसेवक या शिबीरात सहभागी झाले होते. त्यामध्ये 17 मुली होत्या तर 57 मुले होती. तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ. अतुल कुलकर्णी व डॉ. प्रफुल्ल शेडे व प्रा. संतोष मोटेगावकर हे शिबीरात उपस्थित होते. तसेच महिला प्राध्यापकांची महाविद्यालयाकडून दररोज दोन या प्रमाणे नियुक्ती करण्यात आली होती. शिबीर काळात या गावात कामे झाली. यामध्ये पुढील प्रमाणे कामे झाली.

**1. वनराई बंधारे :–**

गावातून एक ओढा वहातो. या ओढयाला पावसाळयात भपूर पाणी असते, मात्र साधारण नोव्हेंबरच पर्यंत यातून पाणी वहाते. नंतर पाणी रहात नाही. म्हणून ही गरज ओळखून एकूण 3 वनराई बंधारे बांधण्यात आले. यामुळे पुढील किमान 3 महिने जनावरांना पीण्यास पाणी मिळेल एवढे पाणी अडवले गेले.

**2. ग्राम सफाई :–**

संपूर्ण गावाची सर्व विद्यार्थ्यांनी मिळून साफ सफाई केली. यामध्ये साधारण 15 किलो प्लास्टिक कचरा निघाला. तो गावाबाहेर नेऊन जाळून टाकण्यात आला.

**3. नाली काढणे :–**

गावामध्ये सांडपाण्यासाठी म्हणून स्वयंसेवकांनी नालीसाठी प्रवाहकाढून दिले, की जेणे करून पाणी इतरत्र कोठेही वाहणार नाही.

**4. झाडांसाठी खड्‌डे खणणे :–**

गावामध्ये ग्रामपंचायत इमारती भोवती झाडे लावण्यासाठी खडडे खणले.

**5. बेसलाईन सर्व्हे :–**

शिबीरार्थींनी ग्रामपंचायतीच्या सहकार्याने एकूण 250 कुटुंबाचा सर्व्हे करण्यात आला. यामध्ये आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्त्रीयांच्या समस्या, आर्थिक स्थिती यासंदर्भात हा सर्व्हे करण्यात आला.

**6. स्थानिक इतिहास लेखन :–**

गवातील पोलीस पाटील श्री बाबासाहेब चोरघे यांच्याा मदतीने व त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे तसेच गावातील इतर वयस्कर गावकरी मंडळींशी चर्चा करून मिळालेल्या माहितीच्या आधारे गावाचा व परिसराचा इतिहास लेखनाचे कार्य केले. तसेच शिबीरार्थींनी विचारलेल्या शंकांचे श्री चोरघे व इतर ग्रामस्थांनी समाधान केले.

**7. सांस्कृतिक कार्यक्रम :–**

शिबीर काळात रोज संध्याकाळी गावक–यांसाठी म्हणून उद्‌बोधनपर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्त्रीयांच्या समस्या, आर्थिक स्थिती, पर्यावरण संवर्धन, स्त्रीभृणहत्या, अंधश्रध्दा निर्मुलन यासंदर्भात कार्यक्रम करण्यात आले. या विषयांवर विद्यार्थ्यांनी नाटके, एकपात्री प्रयोग, कविता वाचन केले.

याबरोबरच एक दिवस महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे वैशिष्टय म्हणजे या कार्यक्रमास गावातील जवळ जवळ 90 टक्के महिला व मुलींनी सहभाग घेतला व यावेळी फेरा धरणे, गाणी म्हणणे, फुगडी खेळणे, उखाणे घेणे यासारखे कार्यक्रम स्वयंस्फूर्तीने गावकरी महिलांनी घेतले.

**8. ग्रामस्थांना सहकार्य :–**

या काळामध्ये गावामध्ये तांदूळ झोडपणे हे काम सुरू होते. गावामध्ये जास्तकरून वयस्कर व्यक्ती रहातात त्यामुळे साळी झोडपणी, पोते भरणे, वाहून नेणे ही कामे करताना विद्यार्थ्यांनी पाहिले व विद्यार्थ्यांनी स्वतःहून यामध्ये पुढाकार घेउन त्यांना या कामी सहाकार्य केले.

वरील सर्व कामे शिबीर काळात करण्यात आली. शिबीर व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीकांत गुप्ता, उपप्राचार्य डॉ.गौतम भोंग, डॉ. भारती भडभडे, डॉ.पी.बी.बुचडे, सर्व प्राध्यापक , कार्यालयीन कर्मचारी, पुणे विद्यापीठ रा. से.यो. समन्वयक डॉ. पंडित शेळके , विभागाचे सर्व स्वयंसेवक, गावचे सरपंच सौ. शमाताई कन्हेरकर, उपसरपंच श्री. रविंद्र चोरघे, सदस्य श्री. दिनकर चोरघे, ग्रामसेवक श्री फडतरे व समस्त गावकरी मंडळी यांचे बहूमोल सहकार्य लाभले व शिबीर यशस्विरित्या पार पडले.

डॉ. अतुल कुलकर्णी
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना